म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १४८.
७९२८

# सुनीत-माला.

REFBK-0003979
REFBK-0003979

मराल.

# सुनीत-माला.

मराल.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र.

सन १९२९.

REFBK-0003979
REFBK-0003979

किंमत ८ आणे.

प्रकाशकः—
अनंत मोरेश्वर भणगे
२६७ सदाशिव पेठ पुणें सिटी

* * * * *

I filled my tray with whatever I had, and gave it to you.

Is there not a single flower made fadeless by the eternity of tears?

Will you thank me with your eyes when I stand before you with empty hands at the leave-taking of my summer days?

Rabindranath Tagore.

* * * * *

मुद्रकः—
शंकर नरहर जोशी
१०२६ सदाशिव पेठ चित्रशाळा प्रेस पुणें सिटी.



—रा. मराल.—

# प्रस्तावना.

' सुनीत ' हा एक नवा काव्यप्रकार आमच्या मराठींत आला आहे. अलीकडे बरींच सुनीतें होऊं लागलीं आहेत.

वास्तविक हा प्रकार मूळ इंग्रजी (Sonnet) सॉनेटची मराठी छबी होय. सुनीत हें नांवहि नवीनच घडवून घातलें आहे. इंग्रजीच्याहि पूर्वी हा काव्यप्रकार इटालियन भाषेंत प्रसिद्धि पावला. मूळ इटालियनापेक्षां निराळाच प्रकार शेक्सपियरनें रूढ केला. त्यांत शेवटल्या दोन ओळींत काय ती मेख ठेवलेली असते; आणि त्याचेंच बव्हंशानें अनुकरण मराठींत चालूं आहे.

सॉनेट ऊर्फ सुनीत हा रचना-प्रकार फार बारकाव्याचा मानला जातो. एकाद्या चित्राचा किंवा मूर्तीचा आकार मोठा प्रशस्त असला म्हणजे त्यांत बारीकसारीक प्रमाणाचे फरक असले तरी तसले दोष लोपून जातात. परंतु तीच मूर्ति किंवा चित्र अगदीं लहान आकाराचें असलें तर किरकोळ कुसळाएवढा दोषहि सहज मुसळाएवढा दिसतो ! सुनीताचेंहि असेंच आहे. याचा देह अगदीं अंगुष्ठप्रमाण. यास्तव सर्व लवणें वाकणें आणि मोडी मुरडी एवढ्याशा नाकपुडीएवढ्या आकारांत उठवून दाखवितां आल्या तरच यशस्वी सुनीत तयार होणार. यामुळें नाजूक हातानें कलम चालविल्याशिवाय अपयश टळण्याचा यांत संभव नाहीं ! नुसती रचना म्हणजे बाह्यांग सांभाळून कसें भागणार ? भावनेचा व विचाराचा मसाला व्यवस्थित भरून ठेवलाच पाहिजे. यामुळें सुनीतरचना ही मोठ्या जोखमीची कामगिरी आहे.

इंग्रजींत साधारणपणें ( १ ) पेट्रार्की ( २ ) स्पेन्सरी ( ३ ) शेक्सपिअरी ( ४ ) मिल्टनी ( ५ ) नवीन. असे पांच भिन्न प्रकार सुनीताचे रूढ आहेत. परंतु वरील बाह्यांगांतरंगांबद्दल सर्व प्रकारांत सावधगिरी ठेवावयास हवीच हवी.

मराठी कानाला व मराठी मनाला हा सुनीत प्रकार रोचक कसा करतां येईल

हा मुख्य प्रश्न आहे. चौदा ओळी किंवा त्यांतील षट्काष्टकांचे टप्पे किंवा शेवटची दोनपदरीं मिरगांठ हेच मराठीच्या प्रकृतीशीं जमतात काय ? हेंच पाहण्यासाठीं सर्व प्रकार करूनच पाहिले पाहिजेत.

मराठींत सुनीतरचना या दृष्टीनें प्रथमावस्थेंतच आहे. अजून तिची नियमपरंपरा तयार व्हावयाची आहे. रुपयाचा नाद जसा वाजवून पहावा लागतो तशीं निरानिराळी नवीं जुनीं वृत्तें या सुनीताला लावून, वाजवून (अथवा गाऊन म्हणा) पाहिलीं पाहिजेत. तोंवर मनापासून होतील तितके प्रयोग होऊं द्यावे.

रा. मराल यांनीं आपला नाद पुरविण्यासाठीं वेळोवेळीं रचलेलीं सुमारें २६ सुनीतें येथें एकत्र करून रसिकांस सादर केलीं आहेत. यांत त्यांनीं शार्दूलविक्रीडित, गज्जल, आर्या, मंदारमाला वगैरे भिन्न वृत्तांचा उपयोग करून सुनीतरचना केली आहे. कांहीं नमुना पुढें ठेवून कांहीं रचना केलेली दिसत नाहीं. कवीचें हृदय कोमल आहे आणि त्याच्या मनाला निराशा बोंचते आहे हें त्यांच्या उद्गारावरून स्पष्ट दिसतें. कवीची रचना विशेष प्रौढ आहे. अजून भावना मोकळी व सूक्ष्म होत जाईल तसतसा शुद्ध मराठी शब्दांचा गोतवळा कवीच्या संग्रहीं वाढत जाईल, भावना काय किंवा रचना काय, उपयोगानेंच विकसित होत असतात. चार नमुन्याच्या कवितांवरून याबद्दल कांहींसा कयास बांधण्यापलीकडे कांहीं अधिक करतां येणार नाहीं. रा. मराल यांची भावना सात्विक आहे आणि रचना भारदस्त आहे त्यामुळें त्यांची कविता पाहण्यास रसिकांस निमंत्रण देण्याचें कार्य करण्यास मला संकोचण्याचें कारण दिसत नाहीं.

आपल्या प्रियजनांस व हितचिंतकांस आपणांस लाभलेली नवी वस्तु दाखविण्याचा मोह स्वाभाविक सर्वांसच असतो. पाळण्यांतलें नवें बाळ, नुकतेंच बांधलेलें नवें घर, नवपरिणीत वधू, यांचें कौतुक दुसऱ्यांनीं करावें म्हणून सर्वांची इच्छा असते आणि तशी चालहि पण आहे. आकाशांत चंद्रसूर्यांनींच चमकावें आणि बाकीच्यांनीं काय तोंडें लपवावीं ? " आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी. " हा न्यायच आहे. तोच कवी व लेखक यांना लागूं केला पाहिजे. त्यांच्या भावना रचना व विचार शुद्ध व प्रतिष्ठित असावेत म्हणजे झालें. मग आपापल्या मगदु्रप्रमाणें संचार–स्वातंत्र्य उपभोगण्यास त्यांस प्रतिबंध असूं नये.

नव्या कवीला याच पोषक दृष्टीची अपेक्षा असते, मात्र त्याचें चालणें पाया-शुद्ध असलें म्हणजे पुरें आहे. यामुळेंच आपली ' हृज्ज्योती ' पाजळून आरती गाणारा हा कवी पुढील प्रश्न विचारीत आहे:—

**उपहार उज्ज्वल प्रीतिचा ।**
**करणार का अवहेलना ? ॥**

त्यास,

**या भक्तिच्या अणि प्रीतिच्या ।**
**कवना न कां करुं सेवना ? ॥**

असें उत्तर आपण सर्वांनीं द्यावें.

नवें पंचांग
रामनवमी
शके १८५१
पुणें

**दत्तो वामन पोतदार.**

# अनुक्रमणिका.


| कवितेचें नांव | पान |
| --- | --- |
| शारदेच्या चरणीं. ... ... ... | १ |
| प्रभात ! ... ... ... | २ |
| सीमोल्लंघन. ... ... ... | ३ |
| हा जादुगार कोण ! ... ... ... | ४ |
| ओवाळणी ही घर ! ... ... ... | ५ |
| अंधत्वयाचना. ... ... ... | ६ |
| अनुताप. ... ... ... | ७ |
| मोकळ्या मनाचें गाणें. ... ... ... | ८ |
| वामनयन-स्फुरण. ... ... ... | ९ |
| गुलाबी लपंडाव. ... ... ... | १० |
| लक्ष्मीपूजन. ... ... ... | ११ |
| वृद्ध आंधळा. ... ... ... | १२ |
| वृद्ध आंधळा. ... ... ... | १३ |
| मानवी संसार व ईश्वरी संसार. ... ... | १४ |
| जात्याची घर्घर. ... ... ... | १५ |
| मित्रास. ... ... ... | १६ |
| दयितेचा शोध. ... ... ... | १७ |
| पुष्पाभरणें. ... ... ... | १८ |
| लाटेचा धक्का. ... ... ... | १९ |
| जिवितमय आकाश. ... ... ... | २० |
| कविता-कन्येस. ... ... ... | २१ |
| श्वान-क्रंदित. ... ... ... | २२ |
| मंगलपाठ. ... ... ... | २३ |
| गुळ्या ! ... ... ... | २४ |
| प्रेमाची प्रसन्नता. ... ... ... | २५ |
| स्वात्मार्पण. ... ... ... | २६ |

# सुनीत–माला.

३८५८

## शारदेच्या चरणीं.

( गझल )

खुडिलीं फुलें बघ शारदे ! हृदयांतल्या वनिकेंतलीं,
वनमाळ ही चरणांवरी तव वाहण्या नव गुंफिली !
मधुगंध ये हिजला न वा, मज हें मुळीं समजेचिना,
उपहार उज्ज्वल प्रीतिचा, करणार कां अवहेलना ?
नजरेंतलीं फिरतां जरा तव हीवरी मधुमोहनी,
खुलतील वासव–चापसे निमिषांत रंग तरंगुनी !
भरतील नंदन–गंध सुंदर सर्वही भुवनांगणीं,
अलिवृंद मंजुलगुंजनें रस चुंबितील विमोहुनी !
नच वर्षतां बरसात ती तव प्रीतिचीच सुधामयी,
झळ लागुनी विष–वायुची चिमणीं फुलें सुकतील हीं !
फुलवीं तरी फुलत्या जिवां मधुदृष्टिचें जल सिंचुनी,
कवळ्या उन्हामधिं खेळतां बघ कौतुकें निज अंगणीं !
चिमणीं फुलें—चिमणीं मुलें—चरणांवरी तव वाहिलीं,
पदरांत झांकुनि आपुल्या क्षणिं चुंबिं हीं मम सोनुलीं !

# प्रभात !

( शार्दूल विक्रीडित )

झाली पूर्वदिशा सुरक्त; इतरा सानंद हास्यानना !
वायू मंद सुगंध रम्य कथितो वार्ता शुभा भू-वना:-
शैलाच्या शिखरीं चढून जगता न्हाणील तेजें कुणी
उल्हासोर्मि चहूंकडे उसळतां हांसेल तेजोमणी !
चिन्हें स्पष्टच हीं ! दिसेल अचिरें सर्वांस पूर्वांगणीं
आला दाखविण्यास नूतन दिना ध्वांता नभीं नाशुनी.
सृष्टीचें मधु चित्र हें निरखितां आनंद होई खरा,
चित्तीं व्याकुलता भरे जसजसा त्या रंग हा साजिरा !
चित्ताच्या क्षितिजावरी निबिड हा अंधार माझ्या भरे;
गेले भावहि काळवंडुनि महानैराश्यरोगज्वरें;
होई अंधुकही मुळींच न कुठें तें चिन्ह दृग्गोचर,
दिव्योल्हास-दिनोदया सुचवि जें संहारुनी काहुर !
वैषम्यें हृदयांतलीं निरसुनी दिव्यांशुभास्वन्मन
भानो ! हें तव केधवां समरसें ऐश्वर्य मी पाहिन ?

# सीमोल्लङ्घन.

( शार्दूल विक्रीडित )

आला ना दसरा ! सणांत सण हा आनंददायी खरा !
सौख्याची लयलूट आज ! मुखडा होवो पुरा हांसरा !
गेले दुर्दिन ! रम्य शस्य–वसना नेसून हांसे धरा;
गातो गीत तियेस, घेत गिरक्या, वाराहि हा नाचरा !
सीमोल्लङ्घन सान थोर करण्या सायंतनीं सज्जले;
आशेचे नव वारु चौखुर जवें आस्वर्ग फुंफाटले !
आतां मंगलसंगमीं वसुमती स्वर्लोक आलिंगिल;
दिव्याचा नवलाख साज निज ही अंगीं मुदें लेइल !
सीमोल्लङ्घन ! हाय, दुर्दम परी मद्धोवतीं बंधनें;
आशा, भीति हृदीं सदैव करिती अस्तोदयी कंदनें !
नाहीं तीळ उसंत संतत जिवा हा घोर भारी पिळी;
देतां सादहि ये न, हांक मधु जैं ये दूर दिव्यांतली !
झालों आतुर फार मी, धरिं उरीं, येई अतां शारदे !
उल्लङ्घून जडास या, बळ मला दिव्यीं स्थिरायास दे !

# हा जादूगार कोण ?

( शार्दूल विक्रीडित )

केलें सुंदर इंद्रचाप गगनीं निर्माण सप्तद्युति;
वज्राघात करोनि वारिदवपू भेदोनि नानाकृति,
वृष्टी अद्भुतरम्य कांचनमयी केली महीमंडलीं;
चूर्णद्रव्य-सुपूर्ण मुष्टि, अनलीं, रासायनी, होमिली;-
ज्वाला चंड तयें प्रचंड उठुनी उत्तुंग चुंबी नभा,
विश्वा व्यापि अशेष निर्मल तिची रम्या गुलाबी प्रभा;
शून्यांतून नभःपटा प्रकटवी, ज्याचेवरी संकुल—
नाना कोमल मध्यमा परुष हो वर्णच्छटा चंचल.
जादूचा असला मनोरम कुणीं हा खेळ आरंभिला ?
झाला स्तंभित भूमिगोल अवघा देखोनि याची कला
व्योमीं छन्नशरीर काय बनुनी दावीतसे आपुले
जादूचे असले प्रयोग रवि हा तेजःप्रकर्षामुळें ?
मायेच्या अथवा, अनंत पटलीं होवोनि अंतर्हित
मायाधीश तमःप्रकाशजनिता जादू जगीं निर्मित ?

# ओवाळणी ही धर !

( शार्दूल विक्रीडित )

भाऊबीज म्हणोनि आज भगिनी ! तूं रौप्यनीराजन-
घेवोनी तबकीं, शिरीं मम शुभा या अक्षता टाकुन,
गालीं मोदभरें हंसून, मजला सप्रेम ओवाळिसी;
'भाऊ काय अमोल घालिल बरें ओवाळणी !' पाहसी
देखोनी सकुतूहला तव अशी साकाङ्क्ष दृष्टी परी,
वृत्ती कालवुनी, मदीय पसरे अंधार अभ्यंतरीं;
स्नेहाळे ! न सुवर्ण-खूण बरवी ती प्रीतिची सुंदर-
अर्पायास धजे मुळींच तुझिया पात्रांत माझा कर.
दास्याच्या चिर रौरवांत रुतली ही आर्यभू दुर्भगा;
तीची केवळ नामशेष अभिधा हो 'रत्नसू' या जगा;
पोटातें मिळवावयास तुकडा तीच्या प्रियां लेंकरां,
वस्त्रावीण, बनून दीन, करणें देशोधडीं आसरा;
त्यांचीं संतत आंसवें गळुनियां हा सांचला सागर;
तद्रत्नें बघ ओंजळींत भरलीं, ओवाळणी ही धर !

# अन्धत्वयाचना.

( शार्दूल विक्रीडित )

दैवा ! अन्धपणा कधींतरि जरी मातें तुवां अर्पिला,
फेडूं तो उपकार मी तव कसा ना हें कळे कीं मला !
तेव्हां ही जरि अंतरेल मजसी सृष्टी सुचेतोहरी,
दृष्टी दिव्य नवी चिरंतन सुधास्यंदी अहा ! अंतरीं ! !
ठेवोनी हिमबिंदुच्या सुधवला मुक्ता फुलांच्या शिरीं,
देतां तैं अमरेश नंदनगता गुच्छास माझ्या करीं,
साभिप्राय हंसून मी अधरता त्याची पहा, दाविन
स्वोद्यानांतिल, तोषवीन, कलिका ती केवला अर्पुन !
दैवा ! मन्मनिं पूर्ण पूर्ण ठसलें, केवीं कधींही जरी
नाहीं ती फिटणें तुझी उपकृती ऐशी, तुला या परी
आतां निश्चित सांगतों 'न सुम तें, त्याची तरी पाकळी'
या न्यायें उतराइ होइन, जरी मद्दृष्टि हो आंधळी !
कल्पांतावधि त्वाच्छिरीं धरिन मी धाराच ती संतत-
पुष्पांची, अलि गीत गातिल जया मंदारनिंदायुत !!

# अनुताप.

( आर्या )

त्रिभुवनपावन गंगे ! तीर्थजलाची विशुद्ध तव धार
मम वदनांत पडोनी अंतरिंचा दाह शांतवूं पार !
रघुकुलललाम रामा ! अतर्क्य महिमा त्वदीय नामाचा
रसना रतली त्याशीं ! संहरिं अंधार गा मदंतरिंचा !
या या संतजनांनों ! ऋषीश्वरानों ! त्वरा करा आतां !
बोधसुधा पाजा ती अपुली शरणागता मला पतिता !
जेथें परात्पराच्या स्थिरपदिं करिता सदा तुम्ही वास,
न्या तेथ हात धरुनी मातें ! ही एक हो असे आस !
अथवा, पुरें पुरें हें ! अशने ! करिं दारुण प्रहारातें !
चिरडीं शिर मम ! तनुचा एकहि कण गा न ठेविं बघण्यातें !
ये ये, वा वनराजा ! खरतर नखरीं विदार मम ऊर !
आकंठ पान करुनी, तहान निववीं, मदीय मधु रुधिर !
शांति खरी जीवाला लाधेलच, वा, असेंच उतरून
खड्गें स्वकरें जरि निज शिर मुग्धेच्या पदास वाहीन ! !

# मोकळ्या मनाचें गाणें.

( शार्दूल विक्रीडित )

अस्ताद्रीवर मंदमंद हसते संध्या अहा ! सोज्वल;
हंसीं चंद्रकला तिची मुदित ही लाटांसवें चंचल,
तारा मौक्तिक वेंचुनी विहरते आकाशगंगेवर;
यांच्या पावन दर्शनें झडुनि ती गेली तुझी सत्वर—
चित्ताची जडता, खरोखर, सख्या! तेणेंच ऐसें स्फुरें
गाणें अंतरिं हें खुल्या मधुरसें, ओंठांवरी पाझरें !
गा ! गा ! गा ! उडुनीहि स्वर्गभुवनीं जा गुंगतां गुंगतां !
दिव्यानंदरसीं क्षणैकच तरी आत्मा बुडूं दे अतां !
नैराश्यें घनघोर अंध बनुनी मी हाय ! भोवंडतों;
शून्या दृष्टि चहूंकडे फिरवुनी वेड्यापरी पाहतों,
ऐसें हें जडतापिशाच बसलें आहे उरीं माझिया,
वाचे शब्द न एकही फुटतसे भीतीमुळें त्याचिया.
केवीं गोड अशीं मुखांतुनि सख्या ! गाणीं निघावीं तरी !
हेवा यास्तव वाटतो मज तुझा, मातें क्षमा तूं करीं !

# वाम-नयन-स्फुरण.

( शार्दूल विक्रीडित )

कां ऐसा स्फुरतोस वाम नयना ? भूलोकिं या भाविं तें
येसी तूं सुचवावया अशुभ रे ! सांगें मला कोणतें ?
पावे निष्फलता मनोरथ असा आहे कुठें तो तरी ?
मातें भग्न कपर्दिकाहि न गमे ती प्राप्य या भूवरी !
आला जन्म कसा कुठून न कळे; एकेक त्याचा क्षण
लोटीं शून्यमनें कसातरि पहा ! हा दीर्घ कल्पाहुन.—
पानें सर्व गळून झाड अवघें येथें खराटा नटें;
लागे आंतुनि कीड ! तें अशुभही आतां उरें कोणतें ?
ये ये, वा, अशुभा ! न मुग्ध असल्या राहूं भविष्योदरीं;
आहे स्वागत वा तुला ! न असली संकोचवृत्ती धरीं.
माझी एक सख्या ! परंतु विनती नम्रा असे त्वत्प्रती,
कीं वार्ता अशुभा अशी कथिं मला, समूढ ही मन्मती
तेणें होवुनि जवि विस्मृतिमधें नांदेल हा शाश्वत,
ब्रह्मांडांत अनंतकोटि भरुनी राहील संचारत !

# गुलाबी लपंडाव.

(शार्दूल विक्रीडित)

होती चालत मंद मंद युवती कोणी पुढें माझिया
मार्गातून, अहा ! सुरम्य विलसे मागें तिचा पाहण्या
काळा केशकलाप दाट, गळला मानेवरी कांहिंसा
अंबाडा मधु पद्मिचा विपुलसा, अत्यंत बालार्कसा
चेतोहारि नवा गुलाब हंसरा त्याचेवरी खोंविला;
वाटे, मेघ सुनील बालचपला आलिंगिते मंगला !
चित्तीं प्रीति-गुलाब वा, बहरला खेळूं फुलें लागलीं
गालीं, नाचुनि हांसलीं, संवगडी शोधावया धावलीं !
' पुष्पांनों ! गमते, तुम्हीं सकल कीं गेलाच वेडावुनी,
धावा व्यर्थ असें ! कुणी हनुवरी, नासाशिरीं वा कुणी,
डोळ्यांचे कुणि पुंडरीक डुलवा, भाळीं चढा वा, कुणी,
कानांच्या कुणि शुक्तिकांस लववा ! नाहींच तेथें कुणी !
कां घेतां अणि हा गळ्यास वळसा ? ये कोण येथें असें ?'
'अंबाड्यावरि तें कुणी लपुनि ना बैसें ! न कोणा दिसे !!'

# लक्ष्मीपूजन.

( शार्दूल विक्रीडित )

लक्ष्मीपूजन हें घरोघर ! नवीं लेवून वस्त्रें जन—
जाती हर्षितमानसें धनिगृहीं थाटांत रस्त्यांतून;
सत्कारी यजमान अत्तर-तुरे देऊन त्या आदरें,-
लक्ष्मी सागरकन्यका जणु स्वयं-आविष्कृता संचरे !
नांदे मन्मनमंदिरांत अशुभा ही शून्यता ना परी !
लक्ष्मी मानसमोहिनी ! न विहरे, ती लोपली सुंदरी !
प्रीतीची मधु वीक्षितें न भरितीं मांगल्य हृन्मंदिरीं !
व्यापोनी जड भीषणा शिशिरता ये खिन्नता अंतरीं !!
देवी ! मूर्ति तुझी, सुमंगल जरी ना होई दृग्गोचर,
अस्तित्वीं तव हा अभंग हृदयीं विश्वास माझा स्थिर,
प्रीतीची जळती चिरंतन अशी ही ज्योत मी पाळिन;
आहे धीर, विमोहुनी मजसि तूं देशलि आलिंगन !
हृज्ज्योती परि पाजळून तुज ही गातों आतां आरती,
अश्रूंनीं भिजली सुमांजलि मुदें ही अर्पितों त्वत्मती !

# वृद्ध आंधळा.

[ १ ]

(शार्दूल विक्रीडित)

ये ! ये ! ये ! पृथिवीवरी त्यजुनिया स्वर्गा दयादेवते !
या वेळीं रुचतो कसा सुखद तो स्ववास माते ! तुतें;
आई आर्त जनांस तूं ! तव कसें वात्सल्य गेलें लया !
पुष्पाहूनहि जें सुकोमल कसें केलें मना वज्र त्या !
काठी टेंकित चालला हळुं हळूं हा वृद्ध गे! आंधळा—
रस्त्यानें, करुणस्वरें विनवितां लोकां पहा, भागला.
पोटातें भरण्यास हाय ! करणें लागे हकाटी किती—
यातें, ना द्रवते परी हत अशी येथें कुणाची मती !
येथें संप्रति साच एक नुरला कारुण्यबिन्दू सती !
गे देवी करुणानिधे ! नयनिच्या तूं अश्रुधारांप्रति-
वर्षीं मस्तकिं याचिया, करिं झणीं न्हाणोनिया पावन;
नाहीं काय कसोटिला उतरला अद्यापिही हा जन !
याची भिस्त अतां असे सुसदये ! सारीच तूझ्यावरी !
होतां विन्मुख तूंच, कोठ मग गे जावें तयानें तरी ?

# वृद्ध आंधळा.

[ २ ]

( शार्दूल विक्रीडित )

ये ! ये ! ये ! गिरिकंदरांतुनि मुने ! बाहेर तूं सत्वर,
प्राणांतें नियमून व्यर्थ झटसी कां शोधण्या ईश्वर ?
सन्यासिन् ! न्यस तो क्षणेंक आपुला संन्यास रे निष्फळ;
योगीशा ! तव ती विरक्त मति तूं आसक्त ठेवीं पळ;
भक्ता ! भक्तिरसीं बुडोनि तुझिया गेला पहा, देव तो,
नाहीं बाहिर येत; व्यर्थच किती बा आळवीतोसि तो ?
सृष्टीची मधु मोहनी तुज कशी टाकी कवे ! मोहुनी ?
तीच्या का बहिरंगिं देव वसतो त्या नाचऱ्या, येवुनी ?
भक्ता!योगिवरा!मुने!कविसख्या ! सन्यासि ! याहो चला
सारे सत्वर, वृद्ध हा हळुं हळूं चाले पहा, आंधळा !
प्रेमानें तनु होउनी पुलकिता द्या गाढ आलिंगना—
यातें बाहुयुगीं ! न ईश्वर असे तो अन्य हो ! याविना !
याची पावन मस्तकीं अपुलिया ती पादधूळी धरा !
तन्नेत्रांतिल अश्रुतीर्थ विमल प्राशून मुक्ती वरा !

# मानवी संसार व ईश्वरी संसार.

( शार्दूल विक्रीडित )

झालीं वर्षशतें कितीक, विलया स्वायत्तता पावली !
शौर्यें ती मिळवावया पुनरपी भू शोणितें न्हाणिली.
विद्या उन्मद होउनी करि बळें ती मात भूतांवर !
झाले आज निरर्थ शब्द बहुधा हे काल नी अंतर !!
आश्चर्यें करिते मनास अगदीं जी थक्क विद्युल्लता,
निर्मी कल्पित कोटि रम्य भुवनें ती कल्पना स्फूरिता !
बोले उत्कट भाव सायक जवें हा एकची फेंकिन !
मी सर्वेश्वर मूर्त ! हें भुजबळें ब्रह्मांड आंदोलिन !
धीरोदात्त सुरम्य संसृतिपटीं चित्रें अशीं रंगलीं !
त्रैगुण्योद्भव ही अनंत रचना प्रेमें जयें निर्मिली,
तो शांतेक्षण विश्वसाक्षि कवण्या भावें बघे तीं तरी ?
प्रश्नोर्मी असली हळूंच उठुनी चांचल्य चित्तीं भरी.
“ प्रौढत्वा अनुकारुनी बहुपरी बाळें गृहीं खेळतीं;
लीलाकौतुक तें अपूर्णच, परी माता मुदें पाहती ! ”

# जात्याची घरघर.

( शार्दूल विक्रीडित )

होती एक कुणी दळीत बसली जात्यावरी सुंदरी.
त्याची कर्णकठोर घर्घर भरे सारी गृहांभीतरी;
त्यायोगें सुखशांतता सुचिर ती होवून अस्तंगत,
होतें खिन्नपणें मदीय हृदयीं अस्वास्थ्य तें नांदत.
झालें सुंदरिचें दळून सगळें कालांतरानें तदा,
थांबे घर्घरही सुकर्कशरवा तैशी तयीं एकदां;
शांतीचें फिरुनी घरांत पहिलें साम्राज्य तें थाटलें;
चित्तातें जडलें उदास मग तें अस्वास्थ्यही लोपलें.
स्वार्थी घर्घर ही अखंड करिती रागादिषड्वृत्ति या;
त्यांचा कर्कश घोर नाद भरला चित्तामधें माझिया;
शांतीचा लवलेशही क्षण न हो लाभे कधीं त्यामुळें;
जीवाला जडता जडून गिरवया घेतों भवाच्या बळें !
केव्हां सत्सुखशोषिणी जडगती थांबेल ही घर्घर ?
दिव्या घेवुनि शांति येइल हृदीं चिच्चंद्र केव्हां वर ?

# मित्रास.

( आर्या )

रविरंजित मेघांची सायंतन रम्य-नील नव माला-
गिरिकंठीं न पडाया अधीर इतुकी नभीं सरे लोला;
सागरहृदयीं उठती वत्सलतेच्या असंख्य कीं लहरी,
विधुवदना चुंबाया धावति इतुक्या नभीं न त्याहि परी;
सिंधुस भेटायातें झरझर तटिनी निघे सुविरहार्ता,
परि विरहदहन जाळी केविं तुझा मज, नसेच तिज वार्ता;
रविविरहव्यथित धरी पद्मिनिचें चित्त ती जरी भ्रमरी,
मन्म्लानमनःपद्मा जाणाया ती नसेच शक्त परी;
मधुरसुधा प्राशाया उत्कंठित जरि चकोर, चंद्राची,
तन्मानसांत पर्युत्सुकतेचा मम शतांश नच साची;
केकी तृषार्त घनजलबिंदु प्राशावया झुरे भारी,
तदधिक परि तव हृद्घनबिंदुविना जीव तळमळे मदुरीं;
ऐसें असून सखया! पाठीला पोट लागलें सतत;
त्याच्या विवंचनेमधिं गुरफटलों अग्निसाच राखेंत!

# दयितेचा शोध !

( शार्दूल-विक्रीडित )

कोठें तूं बसलीस सांग दयिते ! जोगेश्वरी सन्निध ?
किंवा पेठ सदाशिव, स्थित तिच्या हौदाचिया सान्निध ?
शोधूं मी तुजला कुठें ? गलित हीं गात्रें श्रमें जाहलीं !
उत्कंठा मनिंची न लेशहि परी तेणें असे लोपली !
सारी ही तुजलागि पुण्यनगरी घालूं सखे, पालथी ?
किंवा, गे असशी अशी लपुनि या भूमंडलाच्या पथीं ?
व्योमोद्यानिं निशेचिया खुडिसि हीं तारासुमें सुंदर--
वेलींच्या वलयांत झांकुनि कुठें, सेवोनि संध्याकर ?
तेजाचीं नव मंदिरें उभविलीं स्वर्गा कुणीं लंघुनी,
सारीं शून्यभयाण तीं निरखुनी तो खिन्न होई मनीं !
नेलें वाहुनि तेथ कीं विहरण्या तूंतें तयें साजिव,
देखोनी वदनीं तुझ्या मधुर ती उल्हासवृत्ती नव ?
नाहीं !--हे मिटती अहा ! नयन, ही भेटे सखी अंतरीं :
बोले 'नाथ ! इथेंच नित्य वसतें, गेलें न कोठें दुरी !'

# पुष्पाभरणें.

( दों दिवसांची तनु ही )

रुसे खेळतां वेला घेउनि पदर लोचनीं वेलींचा,
प्रीतिलतेच्या फेन-फुलांची कांची कटिं रचि सिंधु तिच्या;
अमृत केशरी शिंपुनि गगनीं रजनी रेंखी रांगोळी,
मालति-माला नभगंगेची कंठिं तिच्या विधु ही घाली;
झुरे निकुंजीं शांतिसखी बहु विरहें सुविकल होवून;
मुक्तालकिं वनफुलें तिच्या मंदानिल गुंफी चुंबून;
लाजलाजुनी गालिं हांसुनी वळुनि शारदा किति बघते;
काव्य-फुलांचीं दिव्याभरणें लक्ष लेववी कवि तीतें;
शृंगाराची शीतल गंगा परी आणुनी न्हाणून;
कल्पलतांच्या भाव-फुलांचे बहरहि भरभर हे खुडुन;
मृदुल बनविल्या सुमासिंहासनिं कुणास पाहूं बसवून
'मम चित्ताच्या नंदनांतली मधु वनराणी ही !' म्हणुन ?
करुणजलें हा त्याच करुन तरि अभिषेकच त्या गंगेला;
त्याच फुलांचा खिन्नांजलि हा तिच्या सोडितों धारेला !

# लाटेचा धक्का.

( शार्दूल-विक्रीडित )

होतों संसृतिशांतसागरजलीं स्वच्छंद आंदोलत
'आलों कोठुनि ? कोण मी ? वसतसें कोठें ?' मुळीं भान न
झंझावात कुठून काय सुटला ? फोफावली अद्भुत--
आकाशांत प्रचंड लाट; तिचिया उत्तुंग शैलावर--
गेलों वाहुनि; लाल, खारट, कडू, फेसाळ, मातीमय--
पाणी, हाणित घोर तीव्र फटके, नाकीं मुखीं तें शिरें;
श्वासोच्छ्वास पडून बंद अवघा, तो आंतल्या आंतच
लागे जीव हृदंतरीं गुदमरूं, होई बहु घाबरा;
तेव्हां भूल उडे ! प्रकाश पडला अभ्यंतरीं लख्ख हा !
गेलीं विस्मृतिचीं घनाभ्रपटलें सारीं विरोनी पहा !
' आलों तेथुनि ! तेथची मज असे जाणें ! ' मति प्रस्फुरे
' तेथं सत्वर कोण नेइल अतां ! ' हें लागलेसें पिसें !
धक्का संसृतिलाट एकच पुन्हां अत्युग्र देईल कां ?
आत्म्याला चिरशांति चाखविल का चिद्व्योमगर्भातली ?

१५३८

# जीवितमय आकाश.

( आर्या. )

अर्पोनि पश्चिमेला अनुरागाची सुधा रवी जाई,
अनुपम विकास म्हणुनी तन्मुखकमला मुदें बहू पाही;
गगनोदरांत शोभति मेघांच्या रुचिर मालिका रक्त,
आशागुलाब फुलले कपोलपालीं तदीय आरक्त;
संध्यावदनिं अतां परि सुंदर कांती मलूल कीं होती,
शुष्क फुलें मेघांचीं चिंतेची काळिमाच दाखवितीं;
काळ्या निशा-निराशा-च्छाया पसरत पुढें पुढें येती,
तारा तुरळक—उत्कर्षाचीं वीजेंच दिव्य—डोकवती;
अद्भुत होइ कशाची पूर्वेच्या प्रांगणीं नवी वृष्टी ?
पुनरपि कुमुदें मोदें प्रमुग्ध हसतीं तदीय मुखपृष्ठीं ?
आशा रुचिरा केव्हां गगनश्रीमानसास पालविते;
केव्हां नैराश्याचें कठोर हिम तद्विलास करपवितें !
अन् केविं सह्य विषमें, हीतें तम-तेज-तेज-दृष्टीची—
अज्ञेयांतिल दिव्य प्रतिभेची चमक ही न उल्केची ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९७७८



# कविता-कन्येस.

( शार्दुल-विक्रीडित. )

गे बाले ललिते ! नको वदनिंची रम्या रुची मालवूं;
अश्रू सिंचुनि उष्ण, कोमल नको हे गाल कोमेजवूं;
तूंतें खिन्नमुखी अशी बघुनियां मन्मानसीं कालवें;
येई दाटुनि हा गळा गहिंवरें, ना शब्दही बोलवें!
'नाहीं मोहकता मनोहर मुखीं जी रंजवी सन्मती
टाकी बेढब पाउलें !' तुज किती नांवें अशीं ठेविती;
कोणाही रसिकास मान्य अजि तूं नाहींस गे या भुवीं;
नेत्रींचें न तुझ्या हृदंगम कुणा दिव्यत्व तें मोहवीं!
आहे काल अमूप, भूवलयही विस्तीर्ण तेवीं असे;
चिन्ता सोड पुसून अश्रु, हृदयीं धैर्या धरीं राजसे !
ईशें नेमियला कुठें कधिंतरी लाभेल तूंतें वर,
प्रेमें मोहुनिया तुला रसिक तो चुंबील कीं सत्वर !
किंवा, तो विधिलेख अन्यच जरी भाळीं तुझ्या रेखिला,
चित्ताची खणुनीच खांच बरवी झांकीन बाळे ! तुला !

# श्वान-क्रंदित.

( शार्दूल-विक्रीडित. )

आनंदी भरला अनंद शहरीं ! आहे दिवाळी खरी !
ल्याली श्यामल ही म्हणोनि रजनी श्रृंगारदीपावली !
झाली दंग चहूंकडे उडवितां दारू, फटाके मुलें !
भाऊ-बीज म्हणोनि बंधुभगिनी आल्या मुदें भेटण्या !
श्वाना, बैसुनि या परंतु समयीं अंधारिं कोठें तरी,
कां तारस्वर दीर्घ एकच असा त्वां सोडिला अवरीं ?
चित्तीं आठवलें तुला तरि असें हें काय जन्मांतर ?
जेणें व्याकुळ जीव होवुनि करी हृच्छेदि आर्तस्वर !
हो, आहेस इमानि शेतकरि जो त्याचाच तूं चाकर,
ज्याचा शेतमळा उजाड बनला नाहीं सुवृष्टी तयें;
त्यांतोनी परकीय राज्य, म्हणुनी नानापरी गांजला,
नाहीं अन्न, न वस्त्र, दीन बनुनी देशोधडी लागला !
त्याचा हा अवकाळ !—काय तुज ही आहे दिवाळी तरी—
त्याचा हा अवकाळ पाहुनि कसें ना चर्र होई मनीं ! !

# मंगलपाठ.

( शार्दूल-विक्रीडित )

पूर्वानंदन भानु पूर्वगिरिच्या आरूढ पीठावर
लज्जानम्र वसुंधरा प्रणयिनी स्मेरानना सुंदर
गाती मंगलपाठ पाक्षि बसुनी वृक्षांवरी सुस्वर
हो अन्तःपट दूर आरुण ! धरा सेवी रवींचे कर !
हृत्पीठावर होतसें समयिं या आरूढ मी पावन
येई ही प्रतिभा-वधू प्रियतमा मुग्धा अनंतांतुन
गाते मंगल भावना मधुर हीं गीतें अहा ! निःस्वन
सूक्ष्मान्तःपट सत्स्वरूप विरला ! हो स्वादु संमेलन !
आशीर्वाद अतां सुमंगल सख्या ! हा आज देतों तुला;
जेवीं सत्कविता ध्वनीसह सदा क्रीडा करी सोज्ज्वला
किंवा, ती रुचिरा अखंड रमते ज्योति प्रकाशासवें
लाभो संतत ही तुझी सुदयिता संयोग तूझ्यासवें !
आशा एकच मात्र कीं श्रवण हे केव्हां अतां धातिल
गाणीं ऐकुनिया तुझीं सुरस तीं या दोनतारींतिल !

# गुढ्या !

( शार्दूल-विक्रीडित )

वर्षारंभ नवीन ! भास्करसखा चित्रागृहीं रंगला !
मेघश्याम धरा त्यजून वसनां सेवी मुदें मंगलां;
कुंजीं कोमल-कूजितें, खगतती आनंदुनी सुस्वरा,
वाही स्वागत हें सुधामधुरवें आगामिसंवत्सरा !
मोदें पाहुनियां कुठें प्रियमुखा लाजे नवी नोवरी;
कोणी प्रीतिफळा स्वकीय रमणी चुंबी स्वबाहूवरी.
आशेच्या शिखरीं समुत्सुक अजी आरूढ सारें जग !
ऐशा उंच तदीय कां नच गुढ्या व्योमीं चढाव्या मग ?
चित्ताच्या मम नंदनास अवघ्या ही आग लागे परी !
आशेचा भडका उडून मिरवे ज्वाला-गुढी अंबरीं;
गेल्या मोहरल्या जळून अखिला त्या भावना कोमल,
सौंदर्यें हृदयांतलीं करपलीं, तेवीं सुधा प्रेमल !
सारी हाय ! भयाणता पसरली आहे स्मशानी मनीं;
अन् केव्हां चढते नभीं मम गुढी आतां स्मशानी जनीं ! !

# प्रेमाची प्रसन्नता.

( शार्दूल—विक्रीडित )

आली भूरमणी, चतुर्दशमणी—माला करीं घेउनी—
घालाया मम कंठिं, राजमुकुटा किंवा शिरीं स्थापण्या;
नक्षत्रें गगनांतलीं अमित तीं दिव्याभ वा गुंफुनी
व्योमींचीं नव वैभवें नभ-वधू ठाकेल अर्पावया;
मुग्धा नंदन-सुंदरी गजगती मंदारभूषा जरी
रम्या लेवुनि तद्वनाधिपति वा, मातें करूं हर्षली;
काव्याची प्रतिभा स्वयेंचि करण्या केली जरी लाभली;
किंवा, मुक्ति-सुधाधरीं धरियलीं स्वच्छंद रुंजी खरी;
चित्ताची तीर माझिया न असल्या योगें समाधानता,
तृष्णा-सिंधु उफाळुनी वरिवरी जाईल फोफावत;
ऐश्वर्यें जरि लाधलीं अखिलही ब्रह्मांडगर्भंगत,
'व्हावें आणिक!' याचना हृदयिंची होईल ना कुंठित !
मी होईन परी प्रसन्न हृदयीं, ती केवला लज्जित
मुग्धा अस्फुट जैं वदेल 'अपुली ना मी ?' मला वेढित !

३८७८

# स्वात्मार्पण.

( मंदारमाला. )

विद्या सुहृत् संपदा कीर्ति, नादीं ययांच्या फुका काल हा लोटला,
दीनाननीं भाकितां बांधवांची कृपा देह भारी असे भागला,
सत्प्रेमसंसक्त ही मूढ आशा निराशातमीं घोर भांबावली !
अंगारसी संसृती जाळिते, जी मुदें मोहुनी पुष्पसी चुंबिली;
शीडाविना कर्णधाराविना हें असे भग्नतारूपरी जीवित,
संसारसिंधूवरी वायुलाटांसवें संचरें, ना दिशा निश्चित !
इच्छा सुखाची अशी कोणतीही मुळीं मानसीं वावरेना अतां;
कोठें असा सारखा वाहुनीयां स्थिरावेन कांहीं न ये सांगतां!
गे शारदे ! पादसेवेविना ना तुझ्या आस आतां दुजी मन्मनीं;
विद्या, कला, संपदा, कीर्ति, मोदें पदीं अर्पितों तूजसी वंदुनी!
तूं प्रेम, तूं धाम, संसार सारा जिवा पाउलें हीं तुझीं गोमटीं;
तूं तार वा मार, हा जीव भावें असे वाहिला तूजला शेवटीं!
त्वत्प्रेरणेनेंच गे मन्मुखीं ही अशी पाझरे आरती सुंदर;
ओवाळ ती तूजला तूंच आतां करीं आपुल्या घेउनी मत्कर!

REFBK-0003979
REFBK-0003979